सत्यमेव जयते

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,
# महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
# (महिला व बाल विकास विभाग)

**कार्यालयाचा पत्ता : - रायगड भवन, रिअर विंग, पहिला मजला, सी.बी.डी. बेलापूर- ४००६१४**

**Email-** comicdsraigadbhavan@gmail.com

**दुरध्वनी क्र ०२२-२७५७६३८८**

## ई- निविदा

## सन २०२५-२६ या वर्षामध्ये अंगणवाडी केंद्रातील बालकांसाठी

## “पूर्व शालेय शिक्षण संच” पुरवठा

## (PSE KIT)

**निविदा क्रमांक- ICDS/०४/२०२५**

## एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,रायगड भवन,बेलापुर,नवी मुंबई

## ई - निविदा सुचना क्रमांक- ICDS/०४/२०२५

एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई मार्फत सन २०२५-२६ मध्ये खालील दिलेल्या तपशिलाप्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत अंगणवाडी केंद्रामधील बालकांसाठी पूर्व शालेय शिक्षण संचाचा (PSE Kits) पुरवठा ५५३ प्रकल्प स्तरावर (निविदेतील अटी व शर्ती मध्ये नमुद केल्यानुसार ) पुरविण्यासाठी सक्षम, पात्र उत्पादक / अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना (www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर तसेच या विभागाच्या **www.icds.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ई - निविदेच्या नियम व अटी वाचूनच निविदा भरण्यात याव्यात .

निविदा फक्त ई-निविदा प्रणालीद्वारे दिनांक २८/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० पासुन ते दि. १८/०८/२०२५ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील .

| **अ. क्र.** | **साहित्याचे नाव** | **खरेदी करावयाच्या पूर्व शालेय शिक्षण संचाची अंदाजित संख्या** | **अंदाजपत्रकीय तरतूद** | **बयाणा रक्कम** | **सुरक्षा ठेव रक्कम ₹** | **कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत₹** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| 1 | **अंगणवाडी केंद्रामधील बालकांसाठी पूर्व शालेय शिक्षण संच (संचाचे सविस्तर वर्णन निविदेत दिलेले आहे)** | ११०६६९ | ३३.१८९३ कोटी | ३३ लक्ष | ३% | २५,०००/- |

### Date of duration of tender downloading and submission

| | |
|---|---|
| **Period of sale & preparation of bid** | **28/07/2025 at.11.00 hrs to 18/08/2025 upto 17.00 hrs** |
| **Date of bid submission** | **28/07/2025 at.11.00 hrs to 18/08/2025 upto 17.00 hrs** |
| **Pre-Bid Meeting (ONLINE)** | **07/08/2025 at 15.30 hrs** |
| **Date of bid closing** | **18/08/2025 at 17.00 hrs** |
| **Date of bid opening*** | **20/08/2025 at 11.00 hrs** |

* (Or Possible & Feasible Working Day for Commissioner)

| **Particulars** | **Date** | **Time** |
|---|---|---|
| Tender online Pre-Bid Meeting<br>Thursday, August 7 · 3:30 – 4:30pm<br>Time zone: Asia/Kolkata<br>Google Meet joining info<br>Video call link: https://meet.google.com/nmc-qbub-vxw | 07/08/2025 | 03.30 PM |

**If any problem with Online Proposals Please contact on the Following details below -:**

**Contact Us- For any technical queries please call at 24 x 7 Help Desk Number**

**0120-4711 508**

**0120-4001 002**

**0120-4001 005**

**0120-6277 787**

**International bidders are requested to prefix 91 as country code**

**Email support**

**A) For any issues or Clarifications relating to the published tenders. Bidders are requested to contact the respecting tender inviting Authority**

**Technical Support-eproc(at)nic(dot)in**

**Cost of Blank Tender Form:** Bidders can download/purchase/submit-tender by paying Rs.25,000/- (Rs. Twenty-Five Thousand Only) by online only on e-tendering website (www.mahatenders.gov.in) failing this will cause a rejection of bid as non-responsive. Blank Tender form fees is Non-Refundable.

बयाणा रक्कम व निविदा फॉर्मची किंमत फक्त ऑन लाईन पध्दतीने गेटवे पेमेंट सिस्टीम व्दारे स्विकारण्यात येईल. पुरवठा करावयाच्या **पूर्व शालेय शिक्षण संचाचा नमुना** निविदेचा अंतिम दिनांक १८/०८/२०२५ रोजी सायं. **०५.००** वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावा उक्त दिनांकापर्यंत नमुना साहित्य सादर न केल्यास संबंधिताची निविदा अपात्र ठरविण्यात येईल. सदर निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे.

ई - निविदा संबंधीची माहिती आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई या कार्यालयातील फोन क्र. ०२२-२७५७६३८८ वर उपलब्ध राहील.

( कैलास पगारे, भाप्रसे )<br>
आयुक्त<br>
एकात्मिक विकास सेवा योजना<br>
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

# निविदा स्वीकारण्याबाबतच्या नियम व अटी

# अंगणवाडी केंद्रामधील बालकांसाठी पूर्व शालेय शिक्षण संच पुरवठा करावयाच्या साहित्याचे तपशीलवार विवरण व वर्णन

| Sr No | Items Name Specifications | Qty |
|---|---|---|
| 1. | **Bowling Set**<br><br>Bowling set made of high-quality plastic. It should contain one plastic ball having diameter of 100mm with and 04nos of bowling pins (bottle shaped) of multi colours having height of 203mm. All the items should be properly packed. | 01 |
| 2. | **Shape shot Puzzle**<br><br>Made up of high-quality plastic. It contains of a base board with 5 different shapes with holes in between that gets inserted on the rods of the base board.<br>Details of the shapes-<br>1. Pentagon- having one side of 30 mm and height of 7 mm with 5 holes<br>2. Rectangle- having length 49 mm, breadth 27mm and height of 7 mm with 3 holes.<br>3. Square- having length 49 mm and height of 7 mm with 4 holes<br>4. Triangle- having one side length 50 mm and height of 7 mm with 3 holes<br>5. Circle - having diameter 49 mm and height of 7 mm with 1 holes<br>6. Base board- having length 294mm, breadth 66mm and thickness of 13mm. It has different cylindrical rod having height 40mm and diameter of 10mm that get inserted inside the holes of the shapes. | 01 |
| 3. | **Lagori Set**<br><br>Lagori Set made-up high-quality hdpe plastic. It should have 07nos of different sized hexagonal hollow slabs of different colours. Which should be placed above one on another resembling to a pyramid shape with the help of cone shaped plastic hollow centre support having total length of 163mm of pyramid shape plastic/soft ball having diameter of 65mm Set should also contain a plastic/soft ball having diameter of 65mm<br>Following are the detailed dimensions for different hexagonal hollow slabs-<br>1.) Slab no.1 Hollow hexagonal shape slab of having dimension for distance across the flat surface is 160 mm and distance across the corner edges is 174 mm with having hole at the center of diameter 20mm. It should have total thickness of 25mm including 3mm wall rest collar.<br>2.) Slab no.2 – Hollow hexagonal shape slab of having dimension for distance across the flat surface is 144mm and distance across the corner edges is 158 mm with having hole at the center of diameter 50mm. It should have total thickness of 25mm including 3mm wall rest collar.<br>3.) Slab no.3 Hollow hexagonal shape slab of having dimension for distance across the flat surface is 129mm and distance across the corner edges is 141 mm with having hole at the center of diameter 45.5mm. It should have total thickness of 25mm including 3mm wall rest collar.<br>4.) Slab no.4 – Hollow hexagonal shape slab of having dimension for distance across the flat surface is 114mm and distance across the corner edges is 125mm with having hole at the center of diameter 40 mm. It should have total thickness of 25mm including 3mm wall rest collar.<br>5.) Slab no.5 – Hollow hexagonal shape slab of having dimension for distance across the flat surface is 100mm and distance across the corner edges is 109 mm with having hole at the center of diameter 36mm. It should have total thickness | |

| | | |
|---|---|---|
| | of 25mm including 3mm wall rest collar.<br>6.) Slab no.6 – Hollow hexagonal shape slab of having dimension for distance across the flat surface is 84mm and distance across the corner edges is 93mm with having hole at the center of diameter 32mm. It should have total thickness of 25 mm including 3mm wall rest collar.<br>7.) Slab no.7 – Hollow hexagonal shape slab of having dimension for distance across the flat surface is 69mm and distance across the corner edges is 75mm with having hole at the center of diameter 28mm. It should have total thickness of 25 mm including 3mm wall rest collar.<br>Set should be packed properly. Made up of wooden handles and cotton rope. Wooden handle size – 125mm length having diameter of 22 mm with a hole in between for the rope. Rope should be minimum 7mm thick and should be 7 feet long. | |
| **4.** | **Match The Number**<br><br>Match the number made up nontoxic virgin plastic. Its consists of a article tray overall size (L) 202 (W) 161 (H) 9mm. It also has 2 slots having size (L) 132mm (W) 77mm (H) 5mm along with this tray there are 20 interlocking cut outs of size (W) 130mm (L) 76mm (H) 5mm. The cut outs have 2 parts both part interlock with each other properly. There is a 9mm diameter hole in base tray for cut out fitting an unfitting. All articles should be injection moulded. The cut outs should have 4 colour stickers on the upper side with 10 different numbers that match with each other. Complete set should be completely packed. | 01 |
| **5.** | **Activity Books-Marathi**<br><br>Book size 8"x11"<br>Inner page - 80gsm maplitho paper with single colour printing.<br>Cover page - 210gsm art paper with 4 colour printing and lamination. Total number of 40 Pages including cover page.<br>Book should have centre binding. | 02 |
| **6.** | **Activity Books-English**<br><br>Book size 8"x11"<br>Inner page - 80gsm maplitho paper with single colour printing.<br>Cover page - 210gsm art paper with 4 colour printing and lamination. Total number of 40 Pages including cover page.<br>Book should have centre binding. | 02 |
| **7.** | **Match and Fix Animal Habit**<br><br>Match and fix animal habit made up nontoxic virgin plastic. Its consists of a article tray overall size (L) 202 (W) 161 (H) 9mm. It also has 2 mm slot size (W) 132mm (L) 77mm (H) 5mm along with this tray there are 6 interlocking 9 cut outs of size (W) 130mm (L) 76mm (H) 5mm. The cut outs have 2 parts both part interlock with each other properly. There is a 9mm diameter hole in base tray for cut out fitting an unfitting. All articles should be injection moulded. The cut outs should have 4 colour stickers on the upper side with 6 different wild or domestic animal that show where the animal live and witch food they prefer. Complete set should be completely packed. | 01 |
| **8.** | **Weekdays Train**<br><br>Weekdays train made up of high quality virgin plastic. In this toy there are 8 different injection moulded cut outs. One is train engine shape cut out and other 7 are train coach shapes. The cut outs should have 4 colour printed sticker of train and train coach pasted on upper side surface. Overall size of cut outs- | 01 |

| | | |
|---|---|---|
| | 1) Train engine cut out size- (W) 127mm (L) 101mm (H) 5mm. It should be proper train engine shape resembled injection moulded cut out.<br>2) Train coach cut out size- (W) 101mm (L) 88mm (H) 5mm. It should be proper train coach shape resembled injection moulded cut out. In this coach cut out the upper side surface sticker should be weekdays from Monday to Sunday in Marathi and English language. | |
| **9.** | **Writing Slate**<br>Made from High-Quality Material, one side of this kids slate has a white board for use with dry-erase market and Duster (DO NOT use permanent markers). This helps in acquiring hand dominance. Improves pre-writing skills. Size 300mm X 250mm with 3mm thickness. | 01 |
| **10.** | **Plastic container box**<br>Made of High-Quality plastic material. The outer size of bag is length 540 mm, width of 380 mm, height of 180 mm. The bag is separated into two parts. Both top and bottom body parts adjoining with 6 number of interlocks having size of 48mm x 25mm. The bottom of the bag's outer size having Length 540 mm, Width 380 mm, height 130 mm & top outer size of bag is length 540 mm (L) x width 380 mm (W) x height 60 mm. there should be a durable handle for the bag on one side having dimensions 65mm x 120 mm (L X B). The complete container box should be assembled from one side making it possible to open and shut without detaching either of the container box. The complete container should not have any metal hardware for its assembly. Print and advertising on bag: The department scheme name 'PRE SCHOOL KIT'' should be embossed inbuilt moulded at the centre of top side of bag. The name size should be 235mm length x 30mm width. The font thickness should be 3mm. Also for publicity purpose of department, keep provision of rounded engrave groove section having diameter of 100 mm with 3 mm deep at both side of the department scheme name '' PRE SCHOOL KIT'' and Rectangular engraved groove section size of 457 mm length x 125 mm height x 3 mm depth below the department scheme name ''PRE SCHOOL KIT' for pasting high quality sticker. | 01 |

## सर्व साधारण अटी व शर्ती :

A) निविदा फक्त ई निविदेद्वारे स्विकारल्या जातील .

B) लिफाफा क्रमांक १ हा तांत्रिक लिफाफा आहे व लिफाफा क्रमांक २ हा व्यापारी (commercial) लिफाफा दर भरण्याकरिता आहे .

C) ई - निविदा ही उत्पादक / विक्रेते / पुरवठा धारक यांनीच भरावीत. या निविदेत निविदा भरणाऱ्या संस्थेस निविदाधारक असे संबोधिन्यात येईल. सदर निविदेत निविदाधारक संस्थेस भागीदार संस्था / Consortium Partner घेण्यास परवानगी नाही.

D) वरील कामाची संपूर्ण माहिती http://www.maharashtra.etenders.in संकेतस्थळावर दिनांक १८/०८/२०२५रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत पहाता येईल व डाऊनलोड करुन घेता येईल.

E) दिनांक २८/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत निविदा ऑनलाईन अपलोड झाल्यानंतर दि. १८/०८/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने Submit करणे अनिवार्य आहे.

F) ऑनलाईन ई-निविदा ही फक्त इलेक्ट्रॉनिक फॉरमेट (प्रपत्रात) http: (www.mahatenders.gov.in) या संकेतस्थळावर प्रसारित झालेल्या अधिकृत फॉरमेट (प्रपत्रामध्येच) दिनांक १८/०८/२०२५ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन सादर करावीत. निविदा ऑनलाईन पध्दतीनेच भरणे बंधनकारक राहील.

G) खरेदी करावयाच्या पूर्व शालेय शिक्षण साहित्याचा एक संचाचा नमुना निविदा सादर करावयाच्या अंतिम दिनांक १८/०८/२०२५ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच पूर्व शालेय शिक्षण संच मधील प्रत्येक साहित्याच्या बाबतीत Specification प्रमाणे साहित्याचे नमुने सादर करणे आवश्यक राहील. तसेच प्रत्येक साहित्यावर संबंधित संस्थेचे नाव नमुद करण्यात यावे. निविदेत नमुद साहित्य नमुना सादर करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. नमुना साहित्य संच सादर न केलेल्या अशा घटक संस्थाना या निविदेत अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

H) ईच्छूक निविदाधारकाने निविदेत नमूद पूर्व शालेय शिक्षण संच साहित्याचा कार्यालयात सादर केलेला नमुन्याचा संच महाराष्ट्र राज्य खरेदी धोरण १/१२/२०१६ मधील प्रयोगशाळा यादीप्रमाणे तपासणी करिता पाठविण्यात येईल. साहित्य तपासणी अंती तपासणी अहवाल योग्य नसल्यास संबधित निविदाधारक या निविदा प्रक्रियेत अपात्र ठरेल व त्याचा व्यापारी लिफाफा उघडला जाणार नाही.

I) नमुना साहित्य तपासणी करीता शुल्क रुपये ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) चा धनाकर्ष **ACCOUNTS OFFICER, ICDSS TENDER MHS, NAVI MUMBAI** यांचे नांवे या कार्यालयास अंतिम दिनांकापूर्वी हस्तेपोहच करण्यात यावा.

J) महाराष्ट्र राज्य खरेदी धोरण १/१२/२०१६ नुसार या निविदेत MSME आणि STARTUP घटकाना निविदा शुल्क आणि बयाणा रक्कम यामध्ये सूट देण्यात आलेली आहे. सदर घटकांनी निविदेतील नमूद साहित्य संच उत्पादन करण्यासाठी लागणारे यंत्र सामुग्रीची यादी निविदेत जोडणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने अशा घटकानी कारखाना तपासणी या कार्यालयाकडून करण्यात येईल. तपासणीत दरम्यान सदर नमूद साहित्य संच उत्पादनाकरीता आवश्यक असलेली यंत्रसामुग्री उपब्लध नसल्यास संबधित घटक या निविदा प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल. तसेच अशा घटकानी भारतीय गुणवता परिषद यांनी प्रमाणित केलेले ‘’ZED certification’’ प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (लागू असल्यास)

K) कार्यालयास संपूर्ण पूर्व साहित्य शिक्षण संच खरेदी करावयाचा असल्याने निविदेत सहभागी असलेल्या MSME/STARTUP /इतर शासकीय /निमशासकीय आरक्षित संस्थानी निविदेतील नमूद साहित्य संचचे संपूर्ण उत्पादित करणे बंधनकारक राहील. या विभागाला केंद्र शासनाच्या नियमानुसार पूर्व शालेय शिक्षण संच खरेदी करावयाचा असल्याने सहभागी निविदाधारकास संस्था निविदेतील नमूद संचमधील १०० टक्के सर्व साहित्य उत्पादित करत नसल्यास अशा निविदधारकास निविदेत अपात्र समजण्यात येईल.

L) स्टार्ट-अप (start-up) घटकांच्या बाबतीत दि. १/१२/२०१६ च्या राज्य खरेदी धोरणातील मुद्दा क्र. ३.१.२.९ मधील अनुक्रमांक १, २ व ३ अनुसार स्टार्ट-अप (start-up) या संज्ञेस पात्र राहतील. व केवळ यानुसार पात्र ठरणाऱ्या संस्थांना स्टार्ट-अप (start-up) म्हणून मान्य करुन त्याबाबत योग्य तो निर्णय ई-निविदेप्रक्रियेमध्ये करण्यात येईल.

a. घटकाची स्थापना/नोंदणी झाल्यापासून ५ वर्षापर्यंत.

b. कोणत्याही वित्तीय वर्षातील आर्थिक उलाढाल (टर्नओव्हर) रु. २५ कोटी पेक्षा जास्त नसेल आणि

c. जो घटक नाविन्यपुर्ण तंत्रज्ञान व बौध्दिक संपदेच्या आधारे नविन उत्पादने, प्रक्रिया किंवा सेवांचा विकास, उपयोगिता या वाणिज्यिकरण्याच्या संबधित कार्य करीत असेल.

**१) ई - निविदेसोबत खालील कागदपत्रे स्कॅन करून (फोटो प्रती सह) जोडणे आवश्यक आहे .**

A) शासकिय मंडळ / महामंडळ / उपक्रमांना तसेच सुक्ष्म व लघु मध्यम उदयोग विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उदयोगांना व पुरवठादारांना बयाना रक्कम भरण्यापासून सुट देण्यात आली आहे याबाबतचे नोंदणीप्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे. (लागू असल्यास)

B) उत्पादक / अधिकृत विक्रेता / उत्पादक कंपनीचे पुरवठादार यांनी ई निविदा फॉर्मची किंमत व बयाणा रक्कम (EMD) ऑन लाईन पध्दतीने गेटवे पेमेंट सिस्टीम व्दारे भरणे आवश्यक आहे व भरणा केल्याबाबतची पावती निविदेसोबत देणे बंधणकारक राहील.

C) महाराष्ट्र शासन खरेदी धोरण दि. १/१२/२०१६ नुसार startup संस्थेने ई निविदेच्या अटी व शतीस अधीन राहून निविदेच्या प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. महाराष्ट्र शासन खरेदी धोरण दि. १/१२/२०१६ प्रमाणे startup संस्थेने सर्व निकर्ष पूर्ण करणे बंधनकारक आहेत. तसेच startup संस्थेने निविदेतील सर्व बाबी निहाय साहित्य संचचे उत्पादन नविन्यपूर्व केल्या बाबतचे उदयोग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग, भारत सरकारचे वाणिज्य उदयोग आणि मंत्रालय यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**२)** वरील अट क्र. १ (A, B & C) मधील वर्णनानुसार असलेली कागदपत्रे ई - निविदेसोबत ऑनलाईन पध्दतीने सादर न केल्यास संबंधित ई- निविदा ही अपात्र (Invalid) ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**३)** ई - निविदेमध्ये नमुद केलेले सर्व साहित्य प्रकल्पस्तरावर पुरवठा करावयाचे आहेत, त्यामुळे दिलेले दर हे कोणत्याही अटी व शर्ती विरहित असावेत.

**४)** एक व्यक्ती किंवा संस्था निविदा प्रक्रियेत वाच्यार्थाने केवळ एकाच निविदेद्वारे सहभागी होतील .

**५)** पुरवठाधारकासोबत समन्वय पुरवठा आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी सहभागी होणाऱ्या ईच्छूक निविदाधारकांचे Registered कार्यालय महाराष्ट्रात असणे आवश्यक असल्याने याबाबतचे शासन नोंदणीकृत दस्तावऐवज (Index -2 / Register rent agreement and 3 years GST मार्च return 3B Copies) सादर करण्यात यावेत.

**६)** निविदाधारकास मागील ३ वर्षात कोणत्याही शासकीय / निमशासकीय कार्यालयाने काळया यादीत सामाविष्ट केले नसल्याबाबत तसेच निविदाधारक यांच्यावर आर्थिक गैरव्यवहार व कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबत रूपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर स्वयंसाक्षांकित केलेले नोटाराईज्ड (Notarized ) प्रतिज्ञापत्र (Affidavit) तांत्रिक लीफाफ्यासह सादर करणे आवश्यक राहील.

**७)** G.S.T. नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**८)** सदर प्रमाणपत्रावर संस्थेचे नाव, संस्थेचा जी.एस .टी नंबर इत्यादी तसेच प्रमाणपत्रावर सध्यस्थितीत कार्यरत असलेले संचालकाचे नावे असणे आवश्यक आहे.

**९)** अधिकृत विक्रेता संस्था अथवा दुकान अथवा कंपनी असल्याचे नोंदणी प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफ्यासह अपलोड करणे आवश्यक आहे.

**१०)** निविदाधारक ( फर्म / कंपनी / पब्लिक सेक्टर कंपनी / सहकारी संथा ) संस्थेमधील भागीदाराचे / संचालक मंडळाचे निविदेत भाग घेण्यासाठीचा अनुमतीचा ठराव व निविदा अर्जास अनुमोदन दिल्या बाबतचे अधिकृत

स्वाक्षरी असल्याचे प्रमाणपत्र तसेच निविदा सादर करणेसाठी Authorization letter तांत्रिक लीफाफयासह सादर करणे बंधनकारक आहे.

**११)** शासकीय मंडळ / महामंडळ / उपक्रमांना तसेच सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये बयाणा रक्कम भरण्यापासून सुट देण्यात येत आहे.

**१२)** निवीदा स्विकृत झालेल्या निविदाधारकांस पुरवठा आदेश निर्गमित झाल्यानंतर त्या आदेशानुसार क्षेत्रीय स्तरावर सदर साहित्याचा पुरवठा होत असतांना सदर साहित्याचे नमुने अचानकपणे अंगणवाडी स्तरावरुन ताब्यात घेऊन व सीलबंद करून उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे दिनांक ०१ डिसेंबर २०१६ मध्ये नमुद केलेल्या अधिकृत प्रयोगशाळेतुन तपासणी करुन घेण्यात येईल या तपासणीसाठीचा संपूर्ण खर्च पुरवठाधारकाना करणे बंधनकारक राहील. साहित्य नमुन्याप्रमाणे व वर्णनाप्रमाणे असल्याचा अहवाल प्राप्त झाल्या नंतरच देयकाची अदायगी करण्यात येईल.

**१३)** निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्यावर निविदेतुन माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

**१४)** निविदाधारकाने निविदा भरताना पुरवठा करावयाच्या वस्तुचे दर हे प्रती संच नमुद करावेत व यामध्ये वस्तुची निव्वळ किंमत तसेच वस्तु व सेवा कर ( G.S.T ) व वाहतुक खर्च तसेच इतर सर्व खर्च समाविष्ट करून एकच अंतिम दर दर्शविण्यात यावेत . व सदरचे व्यापारी दराचे प्रपत्र Commercial Bid यामध्ये अपलोड करावे . तसेच व्यापारी लिफाफा हस्ते पोच सादर करण्यात येऊ नये . व्यापारी लिफाफा कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये जोडल्यास अशा निविदधारकास अपात्र घोषित करण्यात येईल.

**१५)** साहित्याचा पुरवठा झाल्यानंतर साहित्याबाबत कोणतीही तक्रार न आल्यास इंडेम्नीटी बॉण्ड घेऊन सुरक्षा ठेव रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल.

**१६)** सशर्त निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

**१७)** निविदा धारकाची निविदा अर्ज, Minutes of the pre bid meeting व निविदा अर्जासोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर स्वतःची सही व शिक्का (Self - attested) असणे बंधनकारक आहे.

**१८)** वरिल साहित्याची नग संख्या कमी ( - ) अधिक ( + ) करण्याचे अधिकार आयुक्त , एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांना राहतील.

**१९) अ) लिफाफा क्र. १ : तांत्रिक लिफाफा, या लिफाफयात खालील प्रमाणे दस्ताऐवज सादर करणे बंधनकारक राहील .**

I. आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या आर्थिक वर्षापैकी सलगच्या कोणत्याही ३ आर्थिक वर्षाचे आयकर भरल्या बाबतचे विवरणपत्र सादर करावे.

II. निविदाधारकाची उलाढाल सन २०१९-२० ते २०२३-२४ या आर्थिक वर्षापैकी सलगच्या कोणत्याही ३ आर्थिक वर्षाची सरासरी उलाढाल ही किमान निविदेच्या अंदाजित रककमेच्या 40% असल्याबाबत चार्टड अकाऊन्टट यांचे प्रमाणपत्र (UDIN नंबर सह), लेखापरीक्षण (Audit) अहवाल अथवा ताळेबंद, नफा व तोटा अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

III. निविदाधारक संस्थेला सन २०१९-२० ते २०२३-२४ या आर्थिक वर्षापैकी कोणत्याही एका आर्थिक वर्षात खालील नमूद केल्याप्रमाणे किमतीची अथवा यापेक्षा जास्त किमंतीची अंगणवाडी करिता उपयुक्त असलेले पूर्व शालेय शिक्षण संच साहित्याचा कोणत्याही राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभागास पुरवठा समाधानकारक पोहोच केल्याचा अनुभव असावा. या बाबतचे पुरवठा आदेशाची प्रत व संबंधित विभागाचा काम पूर्णत्वाचा दाखला जोडणे बंधनकारक आहेत. सदर दाखला पुरवठा समाधानकारक रित्या पूर्ण केल्याबाबतचा संबधित विभागाच्या विभाग प्रमुख किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी (किमान श्रेणी -१ अधिकारी) यांनी निर्गमित केलेला तथा प्रमाणित केलेला असावा. पूर्व शालेय शिक्षण संच साहित्य व्यतिरिक्त इतर कोणत्याही साहित्य संच मालाचा पुरवठा केल्याचा अनुभव ग्राह्य धरले जाणार नाहीत.

a) निविदेतील अंदाजित रककमेच्या ४०% किमतीची खालील नमूद कालावधी पैकी कोणत्याही एका आर्थिक वर्षात, किमान तीन पुरवठा आदेश आणि काम पूर्णत्वाचा दाखला सन २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीत असणे बंधनकारक आहे.

किंवा

b) निविदेतील अंदाजित रककमेच्या ५०% किमतीची खालील नमूद कालावधी पैकी कोणत्याही एका आर्थिक वर्षात, किमान दोन पुरवठा आदेश आणि काम पूर्णत्वाचा दाखला सन २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीत असणे बंधनकारक आहे.

किंवा

c) निविदेतील अंदाजित रककमेच्या ८०% किमतीची खालील नमूद कालावधी पैकी कोणत्याही एका आर्थिक वर्षात, किमान एकल पुरवठा आदेश आणि काम पूर्णत्वाचा दाखला सन २०१९-२० ते २०२३-२४ या कालावधीत असणे बंधनकारक आहे.

IV) एकात्मिक बालविकास सेवा योजना विभागात राज्यातील सर्व ठिकाणी पुर्व शालेय शिक्षण संचाचा पुरवठा करावयाचा असल्यामुळे निविदाधारकाने यापूर्वी कोणत्याही राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजना विभागातील सर्व प्रकल्प स्तरावर वाहतूक पुरवठा केल्याचा अनुभव जोडणे आवश्यक आहे.

V) निविदा फी व बयाणा रक्कम भरणा केल्याची On- Line confirmation पावती जोडावी. (लागू असल्यास )

VI) निविदाधारक स्वतः उत्पादक असल्यास लघुउद्योगाकडे नोंदणी केल्याचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्राची प्रत. (लागू असल्यास )

VII) निविदाधारकाचे व्यवसायाचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.

VIII) निविदाधारकास मागील ३ वर्षात कोणत्याही शासकीय / निमशासकीय कार्यालयाने काळयायादीत सामाविष्ट केले नसल्याबाबत तसेच निविदाधारक यांच्यावर आर्थिक गैरव्यवहार व कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबत रूपये १००/- चे स्टॅम्प पेपरवर स्वयंसाक्षांकित केलेले नोटाराईज्ड (Notarized) प्रतिज्ञापत्र (Affidavit) तांत्रिक लीफाफ्यासह सादर करणे आवश्यक राहील.

IX) पॅन कार्ड प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.

X) G.S.T. नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रावर संस्थेचे नाव , संस्थेचा जी.एस .टी नंबर इत्यादी तसेच प्रमाणपत्रावर सध्या स्थितीत कार्यरत असलेले संचालकाचे नावे असणे आवश्यक आहे.

XI) निविदाधारकाची निव्वळ संपत्ती (POSITIVE NET-WORTH) निविदेतील अंदाजित रककमेच्या किमान 10% आर्थिक वर्ष २०२३-२०२४ अखेर असल्याबाबतचे CA कडिल प्रमाणपत्र सादर करावे.

XII) निविदेत नमुद साहित्य नमुना सादर करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. नमुना साहित्य संच सादर न केलेल्या अशा घटक संस्थाना या निविदेत अपात्र ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

XIII) नमुना साहित्य प्रयोगशाळा तपासणी शुल्क रक्कम रु. ५०,०००/- धनाकर्षाची छायांकित प्रत जोडण्यात यावी .

XIV) निविदाधारक उत्पादक असल्यास उत्पादनाचे प्रमाणपत्र सादर करावे. (लागू असल्यास)

XV) महाराष्ट्र राज्य खरेदी धोरण दि. १/१२/२०१६ नुसार या निविदेत MSME आणि STARTUP घटकाना निविदा शुल्क आणि बयाणा रक्कम यामध्ये सूट देण्यात आलेली आहे. सदर घटकांनी निविदेतील नमूद साहित्य उत्पादन करण्यासाठी लागणारे यंत्र सामुग्रीची यादी निविदेत जोडणे बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने अशा घटकानी कारखाना तपासणी या कार्यालयाकडून करण्यात येईल. तपासणीत दरम्यान सदर नमूद साहित्य उत्पादनाकरीता आवश्यक असलेली यंत्रसामुग्री उपब्लध नसल्यास संबधित घटक या निविदा प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल. तसेच अशा घटकानी भारतीय गुणवता परिषद यांनी प्रमाणित केलेले ''ZED certification'' प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (लागू असल्यास) या विभागाला केंद्र शासनाच्या नियमानुसार पूर्व शालेय शिक्षण संच खरेदी करावयाचा असल्याने सहभागी निविदाधारकास संस्थास निविदेतील नमूद संचातील १०० टक्के सर्व साहित्य उत्पादित करत नसल्यास अशा निविदधारकास निविदेत अपात्र समजण्यात येईल.

**ब ) लिफाफा क्रं. २ व्यापारी दराचा लिफाफा (आर्थिक निविदा) साहित्याचा दर विभागाने लोड केलेल्या निविदा प्रपत्रावरच दर्शविण्यात यावेत.**

**२०)** निविदा भरताना पुरवठा धारकाने पुरवठा करावयाच्या साहित्य संचाचा एकच दर नमुद करावेत व यामध्ये वस्तुची निव्वळ किंमत तसेच वस्तु व सेवाकर वाहतुक खर्च व इतर सर्व खर्च एकत्र दर दर्शविण्यात यावा. अन्य कोणत्याही पृष्ठावर लिहीलेले दर ग्राहय धरले जाणार नाहीत . तसेच दर्शविण्यात आलेले दर स्पष्ट असावेत, त्यात खाडाखोड केलेली नसावी. असे दर विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच व्यापारी दराच्या प्रपत्रामध्ये नमुद सर्व साहित्याच्या संचाची एकत्रित एकुण रक्कम (सर्व खर्च व करासहित) ही तुलना करतांना विचारात घेऊन L१ निविदाधारकाची निवड करण्यात येईल.

**२१)** निविदा On-Line पध्दतीने सादर केल्यानंतर संपुर्ण निविदा दस्ताऐवजाची (व्यापारी लिफाफा वगळून) एक प्रत साहित्याच्या नमुन्यासह निविदा सादर करावयाच्या अंतीम दिनांका पूर्वी अथवा त्या दिवशी सायं. ५.०० वाजेपर्यंत त्यावर फर्मचे नाव व शिक्कासह आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई येथे सादर करावे.

२२) देयकातुन नियमानुसार TDS व GST कपात केले जाईल.

२३) काही न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्याचे क्षेत्र मर्यादा महाराष्ट्र राज्याचे न्यायालय हे राहील . (वेळोवेळी लागु होणारे नियम कायदे आपोआप लागू होतील)

२४) पुरवठा आदेश मिळाल्यापासून विहित केलेल्या कालावधीत नमुन्यानुसार साहित्याचा पुरवठा आदेशीत केलेल्या प्रकल्प स्तरावर पोहोच करावे लागेल. प्रकल्प स्तरावर साहित्य पुरवठा केल्यानंतर बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी पुरवठा आदेशात नमुद असलेल्या वर्णनाप्रमाणे साहित्य प्राप्त झाले व त्याची नोंद साठा नोंदवही मध्ये घेतली असल्याबाबतची पोहोच पावती (झेरॉक्स प्रत ग्राहय धरली जाणार नाही), बाल विकास प्रकल्प अधिकारी/अधिकृत प्रतिनिधि यांच्या स्वाक्षरीने आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई यांना सादर केल्याशिवाय देयकाची रक्कम अदा केली जाणार नाही.

२५) सदोष (उदा.फाटलेले, तुटलेले भिजलेले, जळालेले किंवा अपुर्ण साहित्य इत्यादी) एक महिन्यात परिस्थितीनुरूप बदलून देणे बंधनकारक राहिल. तसे न केल्यास पुरवठा धारकाचे विरूध्द कायदेशीर कारवाई करून सदर साहित्याची रक्कम पुरवठा धारकाकडून वसुल केली जाईल. आवश्यकता वाटल्यास संबंधितास कायदेशीर नोटीस बजावून त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यासाठी शासनास शिफारस केली जाईल.

२६) सदरच्या साहित्य पुरवठयाचे आदेश प्राप्त झाल्यापासुन १८० दिवसांच्या आत आदेशात नमुद केलेल्या प्रकल्प स्तरावर साहित्य पुरवठा करणे पुरवठा धारकास बंधनकारक राहील तसेच विशिष्ट परिस्थितीत पुरवठा कालावधीत वाढ करण्याचे (मुदतवाढ) अधिकार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई यांना राहतील.

२७) सदरच्या साहित्य पुरवठयाचे कालावधीत वाढ करण्याचा संपूर्ण अधिकार आयुक्त , एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे.

२८) सदर साहित्याचा पुरवठा विहीत वेळेत न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या साहित्याच्या किंमतीवर मुदतीनंतरचे कालावधीकरिता (निर्धारित पुरवठा कालावधी वगळून) ०.५ % प्रति आठवडा याप्रमाणे दंड आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे राहील .

a. पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत दोन लाखा पेक्षा कमी असेल तर अशा साहित्याच्या किंमतीच्या १० % दंड .

b. पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत दोन लाखा पेक्षा जास्त असेल तर अशा साहित्याच्या किंमतीच्या ५ % दंड .

२९) मंजूर केलेल्या नमुन्याप्रमाणे वस्तूचा पुरवठा करण्यात यावा, अन्यथा साहित्य स्विकारले जाणार नाही. तसेच असे साहित्य स्वखर्चाने परत न्यावे लागेल. त्याकरिता कोणताही खर्च या कार्यालयाकडून दिला जाणार नाही व साहित्य पुरवठा आदेश रद्द करुन अनामत रक्कम जप्त करण्यात येईल . तसेच करार उल्लंघनाबाबत कायदेशीर कारवाई केली जाईल.

३०) महाराष्ट्र राज्य खरेदी धोरण दि. ०१/१२/२०१६ नुसार निविदा रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई यांनी राखून ठेवले आहे.

३१) खरेदी करावयाचे साहित्य कमी अथवा अधीक होऊ शकेल तसेच खरेदीसाठी ठरविण्यात आलेली तरतूद कमी अथवा जास्त होवू शकेल याबाबत दिनांक ०१ डिसेंबर २०१६ चे खरेदी विषयक धोरणात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

३२) यशस्वी निविदाधारकाने पुरवठा केलेले साहित्य आवश्यक असल्यास (BIS) ब्यूरो मानक संस्था चिन्ह प्रमाणित असावे.

३३) निविदा मंजूर झाल्यास पुरवठा आदेशानुसार खरेदी रक्कमेच्या ३% एवढी रक्कम सुरक्षा राष्ट्रीयकृत/ अनुसूचित वाणिज्यिक (शेडयूल) बँकेच्या बँक गॅरंटी स्वरुपात Commissioner, Integrated Child Development Service Scheme, Maharashtra State, Navi Mumbai यांचे नावे जमा करावी.

३४) पुरवठा आदेश व निविदेतील अटी शर्तीप्रमाणे मुद्रांक शुल्क (स्टॅप शुल्क) रु. ५००/- वर करारनामा करुन द्यावा लागेल यानंतरच प्रत्यक्षात साहित्याचा पुरवठा करता येऊ शकेल.

३५) सदर साहित्य पुरवठयाबाबत भविष्यात काही लेखा आक्षेप आल्यास त्यातील आक्षेपीत रक्कम पुरवठा धारकाकडून वसूल केली जाईल व त्या वसूल पात्र रक्कमा आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, रायगड भवन, बेलापुर, नवी मुंबई यांचे कडे भरणा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील.

३६) पूर्व शालेय शिक्षण संचची एकूण किंमत (निव्वळ किंमत , जीएसटी , वस्तु व सेवा कर , वाहतुक खर्च व इतर सर्व खर्च समाविष्ट असलेले दर) विचारात घेउनच L—१, L-२ याप्रमाणे निश्चित केले जातील.

३७) निविदेत पूर्व शालेय शिक्षण संच याबाबीचे एकत्रित दर मागविले आहे परंतु निविदाधारकाने साहित्य पोहोच केल्यानंतर याविभागास दयेक सादर करताना विक्रीकर विभागाच्या GST प्रणालीच्या नियमानुसार सर्व वस्तूंचे दर विविध GST टक्केवारी व HSN CODE सह देयकात स्वतंत्र सादर करणे आवश्यक आहेत.

३८) पूर्व शालेय शिक्षण संच मधील साहित्यांचे दर हे एकत्रित मागविण्यात येत असल्याने ज्या निविदा धारकाचे संचचे एकूण दर कमी असतील त्याला L-१ निविदाधारक म्हणून घोषीत करण्यात येईल.

३९) निविदेत मंजुर झालेले दर हे पुरवठा आदेश दिल्यानंतर पुढील एक वर्षासाठी ग्राहय धरण्यात येतील त्यानुसार L-१ निविदाधारकास पुरवठा करणे बंधनकारक राहील.

४०) कोणत्याही कारणास्तव L-१ निविदाधारकास काही तांत्रिक अडचणीमुळे निविदा प्रक्रिया पार पाडणे शक्य न झाल्यास L—२ निविदाधारक L—१ निविदाधारकांच्या दराने दि. १ डिसेंबर २०१६ खरेदी धोरणानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यास तयार असल्यास संबंधित L—२ निविदाधारक पुढील निविदा प्रक्रिया पार पाडण्यास पात्र ठरेल.

४१) निविदा धारक राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाकडे (NSIC) आणि मायक्रो स्मॉल आणि मिडियम इंटरप्राईजेस डेव्हलपमेंट (MSMEDIS ) यांच्याकडे नोंदवलेले सूक्ष्म आणि लघु उद्योजक घटक असल्यास सुरक्षा ठेव रक्कम महाराष्ट्र शासन उद्योग व कामगार विभागाकडील शासन निर्णय दिनांक १/१२/२०१६ मधील मुद्दा क्रमांक ४.६ (अनामत रक्कम) मधील (ड) नुसार पुढील प्रमाणे अवलंब करण्यात येईल.

(ड) राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाकडे (एन एस आय सी) आणि मायक्रो, स्मॉल आणि मिडियम एन्टरप्रायझेस डेवलपमेंट इंन्स्टिटयुट (एम एस एम इ डी आय एस) यांच्याकडे नोंदलेले सुक्ष्म आणि लघु

उद्योग घटक यांना रु. पंचवीस (२५) हजार पर्यंतच्या खरेदीसाठी अनामत रक्कम देण्यातून सूट देण्यात आली आहे आणि खरेदीची किंमत रु. पंचवीस (२५) हजार पेक्षा जास्त असल्यास त्यांना एकुण खरेदी मुल्याच्या तीन (३) टक्के इतकी किंवा रु. दहा (१०) हजार यापैकी कमी असेल तितकी अनामत रक्कम ठेवावी लागेल. तथापि, रु. पंचवीस (२५) हजार पेक्षा जास्त असलेल्या वस्तुंसाठी अनामत रक्कमेची परिगणना करताना, पहिले रु. पंचवीस (२५) हजार परिगणनेमध्ये धरण्यात येऊ नये.

# बंधपत्र

मी / आम्ही गांभीर्यपूर्वक नमुद करतो की , मी / आम्ही वर नमुद केलेल्या अंगणवाडी केंद्रासाठी पूर्व शालेय शिक्षण संच  खरेदीबाबत पुरवठा निविदेच्या सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या आहेत. जर माझी / आमची निविदा स्विकृत करण्यात आली तर या निविदेतील सर्व अटी व शर्तीचे पालन करण्यास मी / आम्ही बांधील राहू. या अटी व शर्तीचा भंग मी / आम्ही केल्यास या निविदेतील अटी व शर्ती मध्ये दिलेल्या तपशिलाप्रमाणे मी / आम्ही दंडनीय कारवाईस पात्र राहू. या निविदेच्या सर्व अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.

स्थळ :

दिनांक :

निविदा धारकाची सही व शिक्का

नाव :

पत्ता :

## दंडात्मक कार्यवाही

१. पुरवठादारास उपरोक्त मागणीनुसार आदेश मिळाल्यापासून १८० दिवसाचे आत त्यास नेमून दिलेल्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पस्तरावर विहित वस्तूंचा ( संचचा ) पुरवठा विनाविलंब पूर्ण करावा लागेल. समर्थनिहाय कारणे असल्यास पुरवठा कालावधीमध्ये वाढ करण्याचे अधिकार आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना राहतील. विहित मुदतीत म्हणजे पुरवठा आदेश मिळाल्यापासून १८० दिवसांचे आत पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या साहित्याच्या किंमतीवर मुदतीनंतरचे कालावधी करिता अर्धा (०.५%) टक्का प्रति आठवडयाप्रमाणे दंड आकारला जाईल व त्याची कमालमर्यादा खालीलप्रमाणे असेल.

(अ) विहित मुदतीत पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रुपये दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १० टक्के दंड

(ब) विहित मुदतीत पुरवठा न केलेल्या साहित्याची किंमत रुपये दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५ टक्के दंड

२. विहित कालावधीमध्ये पुरवठा न केल्यास उत्पादकांचे कंत्राट रद्द करण्याचे अधिकारआयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना राहतील.

३. जर पुरवठाधारकाने नमुन्याप्रमाणे नसलेल्या तथा निकृष्ठ दर्जाच्या पूर्व शालेय शिक्षण संच पुरवठा केला तर असा माल त्यांना स्वखर्चाने परत न्यावा लागेल.

४. पुरवठाधारकाला हा ठेका किंवा ठेक्याचा कोणताही भाग इतर कोणत्याही व्यक्तीला , संस्थेला फर्मला कंपनीला किंवा खाजगी विक्रेता यांना हस्तांतरीत करता येणार नाही. ज्यांना पुरवठयाचे काम दिले आहे त्याच पुरवठाधारकाने पुरवठयाचे काम करावयाचे आहे. उपपुरवठादाराची नेमणूक केल्याचे आढळल्यास पुरवठयाचे कंत्राट रद्द करण्यात येईल.

५. या संदर्भात उद्‌भवणाऱ्या कोणत्याही विवादास्पद मुद्दयांवर निर्णय देण्याचे अधिकार आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना राहतील.

६. या संदर्भात न्यायालयीन वादविवाद उद्‌भवल्यास राज्याचे न्यायालयाचे परिक्षेत्रातच त्याचा न्यायनिवाडा करण्यात येईल.

७. वरील सर्व अटी व शर्ती मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला मान्य आहेत व त्या मला / आम्हाला स्विकृत असून स्वाक्षरीसह सोबत जोडल्या आहेत. निविदा मंजूर झाल्यानंतर पुढील पाच वर्षाचे कालावधीपर्यंत याच दराने वरील अटी व शर्तीचे अधिन राहून वेळोवेळी साहित्य पुरवठा करणे माझ्यावर / आमच्यावर बंधनकारक राहील.

निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

## अंतिम निवड झालेल्या पुरवठादारांनी पूर्ण करावयाच्या अटी व शर्ती

1. पुरवठाधारांकडून जमा करण्यात आलेली सुरक्षा अनामत रक्कम संपूर्ण पुरवठयाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर पुरवठाधारकाबद्दल कोणतीही तक्रार नसेल तर क्षतीपूर्ती बंधपत्र प्राप्त करून घेतल्यानंतर परत करण्यात येईल व शासनाकडून सुरक्षा अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देता येणार नाही.

2. नमुन्याप्रमाणे माल न पुरविल्यामूळे उशिरा माल पुरविल्यामूळे किंवा अन्य कारणास्तव पुरवठाधारकास दंड झाल्यास दंडाच्या रकमेची वसुली प्रथम त्याच्या देयकांमधून करण्यात येईल व दंडाची रक्कम देयकापेक्षा अधिक ठरल्यास त्याची वसुली सुरक्षा अनामत रकमेतून करण्यात येईल.

3. पुरवठाधारकाला राज्यातील निश्चित केलेल्या व पुरवठा आदेशात नमूद केलेल्या प्रकल्पस्तरावर साहित्याचा पुरवठा करावा लागेल. वरीलप्रमाणे पुरवठा न केल्यास संबंधित पुरवठाधारकाचा ठेका रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना राहतील.

4. पुरवठाधारकाला प्रकल्पस्तरावर पुरवठा करण्यात येणाऱ्या साहित्याच्या पोच पावत्या प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. पुरवठाधारकांनी प्रकल्पांना साहित्याचा पुरवठा झाल्यानंतर संबंधित प्रकल्पातील बाल विकास प्रकल्प अधिकारी वा त्यांचा अधिकृत प्रतिनिधी यांची साहित्य प्राप्त झाल्याची पोहोच चलनावर घेणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पाला साहित्य मिळाल्याची नोंद साठा नोंदवहीत घेतल्याबाबतचा नोंदवहीतील पृष्ठ क्रमांक व माल प्राप्त झाल्याचा दिनांक चलनावर नमुद करणे आवश्यक आहे. अशा पावत्या आयुक्तालयास सादर केल्याशिवाय पुरवठा केलेल्या साहित्याच्या किंमतीचे शोधन केले जाणार नाही .

5. सदर निविदा ही राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत प्रकल्पासाठी आहे . कंत्राटाचे कालावधीत अंगणवाडी केंद्राचे संख्येत / तपशिलात वेळोवेळी वाढ / घट झाल्यास त्यांनाही याबाबत निविदेतील अटी व शर्ती आपोआपच लागू होतील याची मला / आम्हाला जाणीव असून मान्य राहतील .

दिनांक :

स्थळ: निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का

**निविदाधारकांकडून सादर करावयाच्या दरासंबंधीचा लिफाफा क्रमांक 2**
**व्यापारी लिफाफा ( आर्थिक लिफाफा )**

मी / आम्ही खाली सही करणारे श्री. / श्रीमती
पंजीकृत व मान्यताप्राप्त दर्जेदार उत्पादक / विक्रेते असून एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र राज्य अंतर्गत प्रकल्पातील अंगणवाडी / मिनी अंगणवाडी केंद्रामधील अंगणवाडीतील मुलांसाठी पूर्व शालेय शिक्षण संच खालील दराने पूरविण्याचे कंत्राट घेण्यास माझी / आमची तयारी आहे.

मी आम्ही निविदेतील सर्व नियम व अटी / शर्ती काळजी पूर्वक वाचलेल्या आहेत. मी / आम्ही सर्व नियम व अटी / शर्तीची पूर्तता केलेली आहे. निविदापत्रकात मी आम्ही दिलेली माहिती तसेच / दस्तऐवज सत्य असून त्याबाबत मी / आम्ही खात्री देत आहे / आहोत.

१. उत्पादकाचे / विक्रेत्याचे / पुरवठादाराचे नांव :

२. नोंदणी क्रमांक ( Registration Number )

३. कार्यालयीन पत्ता ( दुरध्वनी क्रमांक फॅक्स सहीत )

अंगणवाडी केंद्रामधील बालकांसाठी पुरवठा करावयाच्या पूर्व शालेय शिक्षण संचचे दर हे राज्यातील सर्व प्रकल्प स्तरापर्यंत पुरविण्याचे खालील तक्त्यात दर्शविण्यात येत आहेत. यामध्ये प्रति नग, एकुण किंमत, तसेच या किंमतीत समाविष्ट असलेला वाहतक खर्च वस्तू व सेवा कर ( GST ) व इतर सर्व करासहीत दर्शविण्यात येत आहेत .

| **अनु. क्र.** | **साहित्याचा प्रकार** | **पूर्व शालेय शिक्षण संच मधील साहित्यांची नावे** | **पूर्व शालेय शिक्षण संच साहित्यांची एकूण किंमत प्रति संच ( सर्व दर,खर्च व GST करासहित )** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | **अंगणवाडी केंद्रासाठी पूर्व शालेय शिक्षण संच** | Bowling Set | |
| २ | | Shape shot Puzzle | |
| ३ | | Lagori Set | |
| ४ | | MatchThe Number | |
| ५ | | Activity Books-Marathi | |
| ६ | | Activity Books-English | |
| ७ | | Match and Fix Animal Habit | |
| ८ | | Weekdays Train | |
| ९ | | Writing Slate | |
| १० | | Plastic container box | |
| | | **एकूण संचची रक्कम** | |

(नोट : - वरील संच मधील सर्व साहित्यांची एकच किंमत दर्शविण्यात यावी, प्रत्येक साहित्यनिहाय वेगवेगळे दर दर्शविण्यात येऊ नयेत. कॉलम क्र. ४ मधील साहित्याच्या एकुण संचच्या रक्कमेवरच L1 निविदाधारक घोषित होणार आहे)

वरील अंतिम दर राज्यातील ५५३ ठिकाणच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पस्तरावर पूर्व शालेय शिक्षण संच पोहोचवून देण्याचे असून यामध्ये साहित्याची किंमत सर्व कर, उतराई, चढाई खर्च, पॅकिंग खर्च, हमाली व इतर खर्च यांचा समावेश करण्यात आलेला आहे .

स्थळ :

दिनांक : निविदाधारकाची सही व

शिक्का

नाव :

पत्ता :